दै. पुढारी, दि. १९ जानेवारी १९९८ पान आठ



ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही. टी. पाटील यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना प्रा. राजेंद्र कुंभार शेजारी श्री. गोडसे, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, माधवराव बुधले, रा. कृ. कणबरकर आदी. छाया : पप्पू अत्तार.

# स्त्रियांनी अस्मिता जागवण्यासाठी नवा इतिहास लिहावा : प्रा. जाधव

कोल्हापूर, दि. १८ : समाजाच्या जडणघडणीत स्त्रीचा वाटा मोठा आहे. तरीही तिच्या हक्कांपासून स्त्रियांना वंचित ठेवले गेले. आता आपली अस्मिता जागवण्यासाठी स्त्रियांनी नवा इतिहास लिहावा, असे प्रतिपादन प्रा. राजेंद्र कुंभार यांनी ताराराणी विद्यापीठाचे संपादक डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या तृतीत स्मृतिदिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना केले.

'बहुजन समाजातील स्त्री : शहाणपण आणि स्वातंत्र्य' या विषयावर बोलताना प्रा. कुंभार म्हणाले समाजातील संस्कृती निर्माण करण्याचे खरे श्रेय स्त्रियांना दिले पाहिजे. कारण आजपर्यंत इतिहास पाहता समाजाच्या जडणघडणीत स्त्री हा घटक महत्त्वाचा ठरला आहे म्हणून खऱ्या अर्थाने स्त्री हीच समाजाची कर्ती आणि प्रमुख आहे. परंतु आजतागायत स्त्रियांना आर्यसंस्कृतीने दुय्यम दर्जा देऊन तिचे स्वातंत्र्य महत्त्व कसे हिरावून घेतले आहे याची अनेक वेद कालापासून सद्य:स्थितीपर्यंतची मनोरंजनात्मक उदाहरणे देऊन त्यांनी बहुजन समाजातील स्त्री हे शहाणपण आणि तिचे स्वातंत्र्य याबद्दल विवेचन केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करताना संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीला समर्थ बनवण्याचे काम व्ही. टी. पाटील यांनी केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. जयश्री पाटील यांनी केले. तर प्रा. जे. बी. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या विश्वस्त सौ. राजलक्ष्मी जाधव यांच्या हस्ते व्ही. टी. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर, सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य गोडसे, प्राचार्य मोरे आदी उपस्थित होते.